


दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

dainiklokaarambh@gmail.com
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शनिवार १२ ऑक्टोबर २०२४ | अंक ३०७ | पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु








## दसरा मेळाला नारायणगडावर एकत्र येऊन मनोज जरांगे पाटील यांचे हात बळकट करावे - राहुल वाईकर



बीड प्रतिनिधी:- शेतकऱ्याच्या दीनदुबळ्या व कष्टकरी गोरगरीब जनतेच्या न्याय हक्कासाठी मराठा समाजाचा व अठरापगड सर्व जाती धर्मासाठी नारायणगड येथे भव्य दिव्य असे दसरा मेळाव्याचे आयोजन सुरु आहे या अनुषंगाने नारायण गड परिसरात सर्व येणाऱ्या लोकांचे गैरसोय होऊ नये यामुळे मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आदेशावरून सर्व गोष्टीची बारकाईने लक्ष देऊन तयारी चालू आहे जेणेकरून येणाऱ्या बांधवांची पार्किंगची व्यवस्था किंवा राहण्यापासून ते जेवण्यापासून सर्व गोष्टीची व्यवस्था मोठ्या प्रमाणात होत आहे दसरा मेळाव्याच्या तयारीसाठी



असे हजारो हात राबत आहेत बाहेरुन येणाऱ्या भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही त्यांच्या पायात काटा देखील टोचणार नाही याची पुरेपूर काळजी घेतली जात आहे. लाखो भाविक व मराठा बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहील त्यामुळे येणाऱ्या 12 तारखेला नारायणगड येथे आपण सर्वांनी आपल्या कुटुंबाबरोबर व आपल्या मित्रपरिवार बरोबर मोठ्या संख्येने उपस्थित राहून या होऊ घातलेल्या दसऱ्या मेळाव्याची शोभा वाढवावी व संघर्ष युद्ध मनोज दादा तरंगे पाटील यांचे हात बळकट करावे असे मराठा बांधव सामाजिक राहुल वाईक यांनी सर्व बांधवांना आवाहन केलं आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार १२ ऑक्टोबर २०२४
https://lokaarambh.com



# ///आदिशक्ती- प्रकृतीच्या नऊही रूपांची स्थापना///

(घटस्थापना- कलशस्थापना: नवरात्रोत्सव माहिती विशेष)

आपल्या भारत देशात अनेक सण साजरे केले जातात, त्यापैकीच एक सण म्हणजे नवरात्र होय. हा सण भारतातील विविध भागात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. अश्विन महिन्याच्या पहिल्याच दिवशी नवरात्र उत्सवाला सुरुवात होते. नवरात्रीच्या पहिल्या दिवशी सार्वजनिक मंडळामध्ये देवीच्या मूर्तीची स्थापना करतात. हिंदू धर्मग्रंथांमध्ये नवरात्रीच्या सुरुवातीला विशिष्ट वेळेत घटस्थापना विधी करण्यासाठी चांगले नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे आहेत. घटस्थापनेमध्ये देवीची पूजा समाविष्ट आहे, जे योग्य वेळी केली पाहिजे. शास्त्रांनी चेतावणी दिली आहे, की जर हा विधी चुकीच्या वेळी केला गेला तर यामुळे देवीला क्रोध येऊ शकतो. घटस्थापना करण्यासाठी अमावस्या आणि रात्रीची वेळ टाळावी. प्रतिपदा चालू असताना दिवसाचा पहिला एक तृतीयांश घटस्थापना करण्याचा सर्वात शुभ काळ आहे. जर कोणत्याही कारणामुळे ही वेळ उपलब्ध नसेल, तर ती अभिजित मुहूर्ताच्या वेळी करता येते. घटस्थापनेदरम्यान नक्षत्र चित्र आणि वैधृती योग टाळावेत, जरी ते प्रतिबंधित नसले तरी. प्रतिपदा चालू असताना हिंदू मध्यान्ह आधी घटस्थापना करणे सर्वात महत्वाचे आहे, असे शास्त्रात सांगितले आहे.

यावर्षी दि.३ ऑक्टोबर २०२४पासून शरद नवरात्री सुरू झाली. शरद नवरात्री सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात साजरी केली जाते. दुर्गादेवीची पूजा करणे हे भक्तांचे मुख्य कार्य आहे. नवरात्री म्हणजे देवी शारदा, दुर्गा पूजेचा पवित्र सण आहे. नवरात्रीच्या नऊ दिवसांमध्ये देवीच्या विविध रूपांची पूजा केली जाते. घटस्थापना हा नवरात्रीचा पहिला दिवस म्हणजेच नवरात्रीच्या नऊ दिवसांच्या उत्सवाचा आरंभ आहे. घटस्थापना हा नवरात्रीच्या दरम्यान केला जाणारा एक अत्यंत महत्वाचा विधी आहे. कलश स्थापना हे घटस्थापनेचे दुसरे नाव आहे. दुपारी, सूर्योदयानंतर आणि रात्रीची वेळ म्हाणजेच सोळा घाटीच्या पलीकडे कोणत्याही वेळी घटस्थापनेसाठी मनाई आहे. नवरात्री हा हिंदू सण आहे आणि लोक हा सण मोठ्या उत्साहाने साजरा करतात. शक्तीची देवी म्हणजेच दुर्गा देवी यांच्या स्मरणार्थ नवरात्री हा एक भव्य उत्सव आहे. या सणामध्ये देवी दुर्गाची नऊ दिवस वेगवेगळ्या भूमिकेत पूजा केली जाते. देवी दुर्गा नवरात्रीच्या दरम्यान नऊ वेगवेगळ्या रूपात पृथ्वीवर आशीर्वाद देते. देवीचा आशीर्वाद आपल्याला नवरात्रीला दुर्गा, लक्ष्मी आणि सरस्वतीच्या रूपात दिला जातो. नवरात्रीचा पहिला दिवस घटस्थापना केली जाते.

नवरात्रीचा शाब्दिक अर्थ आहे, नऊ धार्मिक रात्रींचा उत्सव किंवा सण होय. या नऊ दिवसांमध्ये देवी दुर्गास तिच्या तीन सर्वोच्च रूपांमध्ये पूजल्या जातात. शारदीय नवरात्रीच्या पहिल्या दिवशी कलश स्थापनेने देवी दुर्गाची पूजा सुरू होते. घटस्थापना पूजेसाठी आवश्यक गोष्टी अशा- सप्त धान्य पेरण्यासाठी मातीचे भांडे-कलश, सप्त धान्य पेरणीसाठी स्वच्छ आणि चांगली माती, सप्त धान्य किंवा सात वेगवेगळ्या धान्यांचे बियाणे, पाणी, सुगंधी अत्तर, पवित्र धागा- माऊली, सुपारी, नाणी, विड्याची पाने, आंब्याची पाने, तांदूळ- अक्षता, नारळ, दोन लाल कापड, फुलांच्या माळा दोन किंवा फुले, दुर्वा- गवत, देवी दुर्गाचे चित्र- मूर्ती, धूप, दिवा, तूप, कापसाची वात, फळे, मिठाई, पूजा थाळी- आरती, हळद, कुंकू, गुलाल, बुक्का, देवीसाठी चुनरी आदी. याशिवाय दोन नारळ एक कळसावर ठेवण्यासाठी आणि एक देवीची ओटी भरण्यासाठी ओटी भरण्यासाठी थोडेसे गहू, सतीच वान, आरतीसाठी निरंजन, निरंजनामध्ये तूप आणि वाती, समोर लावण्यासाठी समई व समईमध्ये तेल आणि वाती याशिवाय खडीसाखरेचा प्रसाद आणि घटाला बांधण्यासाठी झेंडूच्या पानाची माळ आणि घटाच्या भोवती काढण्यासाठी रांगोळी हे सर्व साहित्ये घट सजविताना आवश्यक आहेत. कलश असे भरतात- खुल्या तोंडाचे मातीचे भांडे घेऊन भांड्याच्या अर्ध्या भागापर्यंत माती भरतात. नंतर धान्याच्या बिया घालतात. बियांच्या वर माती घालतात. पुन्हा धान्याच्या बिया घातल्या जातात. मग मातीचा तिसरा आणि शेवटचा थर भांड्यात पसरवला जातो. आवश्यक असल्यास माती सेट करण्यासाठी भांड्यात थोडे पाणी घातले जाते. यानंतर कलशावर पवित्र धागा बांधतात. कलश-भांडे मानेपर्यंत पाण्याने भरावे लागते. कलशमध्ये सुपारी, दुर्वा गवत, सुगंधी अत्तर घातले जाते. कलशमध्ये काही नाणी ठेवावी लागतात. कलशच्या काठावर झाकणाने झाकण्यापूर्वी पाच आंब्याची पाने ठेवली जातात. मग कलशमध्ये अक्षता ठेवाव्या लागतात. एवढे झाल्यावर नारळ घेऊन ते लाल कपड्यात गुंडाळतात. पवित्र धाग्याने नारळ आणि लाल कापड बांधले जाते आणि ते कलशच्या वर ठेवले जाते. शेवटी कलश हा तयार केलेल्या धान्याच्या भांड्यावर मध्यभागी ठेवला जातो. त्यानंतर पुष्पहार, दिवा, धूप काठी, फळे, गोड आणि सुगंध ठेवून पूजा थाळी तयार करतात.

कलश आणि धान्याच्या भांड्याला पहिली प्रार्थना करून देवी दुर्गाचे आवाहन केले जाते आणि तिला विनंती करतात, की आपली प्रार्थना स्वीकारावी आणि नऊ दिवस कलशमध्ये राहून आम्हाला आशीर्वाद द्यावे. नावाप्रमाणे पंचोपचार पूजा पाच पूजा वस्तूंसह केली जाते. दिवा लावून कलशाभोवती प्रदक्षिणा घातली जाते. धूप लावून कलशाभोवती गोल फिरतात. कलशवर फुलांची माला ठेवून फुले अर्पण केली जातात. शेवटी पंचोपचार पूजेची सांगता करण्यासाठी नैवेद्य म्हणजेच कलशला फळ आणि गोड पदार्थ अर्पण करतात. कलशवर अत्तर शिंपडून देवतेला सुगंध अर्पण केले जाते.

# माजलगावात शिवरत्न जिवाजी महाले यांची जयंती उत्साहात साजरी

## – दांडपट्टा, हलगी पथक व सांस्कृतिक कार्यक्रमाने वेधले लक्ष






दैनिक लोकआरंभ//

माजलगाव, प्रतिनीधी : महाराष्ट्र नाभिक महामंडळ जिल्हा बीड च्या वतीने शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात दि. 9 ऑक्टोबर 2024 रोजी सायंकाळी वीर जिवाजी महाले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. हँगिंग डीजे, दांडपट्टा, संबळ पथक व ऑर्केस्ट्राने शहरवासी यांचे लक्ष वेधले. जयंती कार्यक्रमाचे आयोजन जिल्हाध्यक्ष दिलीप झगडे यांचे वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन जयसिंग सोळंके यांच्या हस्ते करण्यात आले तर अध्यक्षस्थानी महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव दळे हे होते. व्यासपीठावर प्रदेश उपाध्यक्ष अच्युतराव लाटे, ज्ञानेश्वर मेंडके, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, विभागीय अध्यक्ष युवराज शिंदे, महामंडळाचे प्रदेश युवक अध्यक्ष सुरेंद्र कावरे, डॉ. सुरेश साबळे, सह्याद्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष नवनाथ गायकवाड, शामसुंदर दळवी यांची उपस्थिती होती. उद्घाटन पर मनोगत जयसिंग सोळंके यांनी व्यक्त केले तर अध्यक्षीय समारोप प्रदेशाध्यक्ष कल्याणराव दळे यांनी केला. यावेळी दांडपट्टा पथकातील सदस्यांनी चित्त थरारक अशा कवायतींचे सादरीकरण करून शहरवासीयांच्या डोळ्यांचे पारणे फेडले तर हलगी पथकातील सदस्यांनी विविध प्रकारचे वाद्य तर ऑर्केस्ट्रा पथकातील सदस्यांनी सांस्कृतिक कलागुणांचे सादरीकरण केले. यात त्यांनी गोदळ गीता सह विविध गाणे सादर केले हँगिंग डीजे च्या तालावर तरुणाई थीरकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन टी.एन. शिंदे, रामराव लांडगे यांनी केले कार्यक्रमाचे आभार आयोजक तथा जिल्हाध्यक्ष दिलीप झगडे यांनी मानले. उत्साहात झालेल्या या कार्यक्रमात मोठा आनंद दिसून आला. कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणात महिला व समाज बांधव उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नाभिक महामंडळाचे उपजिल्हाध्यक्ष किशोर दळवी, सुनील दळवी, ब नागेश खटले, सागर दळवी, रामराव लांडगे, हनुमंत राऊत, वैभव शिंदे, संतोष शिंदे, सतिश राऊत, बाळासाहेब बहिरे, रामकिसन वाघमारे, रोहित दळवी, केशव राऊत श्रीहरी झगडे याच्या सह तरुणांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पार्टी बीड जिल्ह्यात मुस्लिम समाजातील उमेदवारी देऊन न्याय देणार का ?

## माजलगाव मतदारसंघातून मा.नगराध्यक्ष शेख मंजुर यांची उमेदवारीची मागणी




माजलगाव दि.( प्रतिनिधी) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्वेसर्वा शरदचंद्रजी पवार साहेब हे बीड जिल्ह्यातून विधानसभेसाठी मुस्लिम समाजाचा एक तरी उमेदवार देऊन मुस्लिम समाजाला न्याय द्यावा अशी मागणी समाजातून केली जात आहे.

राष्ट्रवादी शरद चंद्र पवार पार्टी कडून बीड जिल्ह्यातील एक विधानसभा मतदारसंघ मुस्लिम उमेदवार साठी सोडतील का? त्यापैकी जिल्ह्यातील माजलगाव मतदार संघातून माजी नगराध्यक्ष शेख मंजूर यांना राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पार्टीकडे उमेदवारी मागितल्याचे कळते. पवार साहेब मुस्लिम समाजातील निष्ठावंत कार्यकर्त्यांना "न्याय देतील का? गेल्या लोकसभेला बजरंग बप्पा सोनवणे यांना विजयी करण्यामध्ये बीड जिल्ह्यातील मुस्लिम समाजाचा सिंहाचा वाटा आहे बीड व माजलगाव या मतदारसंघांमध्ये मुस्लिम समाजाची मतदानाची टक्केवारी जर पाहिली तर बीड नंतर माजलगाव मतदार संघामध्ये मुस्लिमांची मतदार संख्या 50 ते 55 हजार आहे राष्ट्रवादी पार्टी कडून माजलगाव मतदार संघामध्ये शेख मंजूर यांनी उमेदवारी मागितली आहे. जर मतदारांच्या गणिताची जुळवा- जुळव केल्यास जिल्ह्यातील विजयी उमेदवारांमध्ये माजलगावच्या विजयी उमेदवाराची भर निश्चित पडल्याशिवाय राहणार नाही. अशीच स्थिती निर्माण झाली आहे. बीड लोकसभा मतदार मतदार संघातून बजरंग बप्पा सोनवणे हे थोड्या बहुत लीडने निवडून आले हे जरी खरे असले तरी जिल्ह्यातील विरोधी पक्षाला माहित आहे की मुस्लिम समाजाने मोदी विरोधात व शरद चंद्र पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून एकजुटिने मतदान केले होते.त्यामध्ये माजलगाव मतदार संघातून हि बहुसंख्याक मुस्लिम समाजाच्या बुथवरिल टक्केवारी पाहिली तर 90 ते 95 टक्के मतदान हे बजरंग बाप्पाला झाले आहे. त्यामुळे मुस्लिम समाजाने आपल्या समाजातील व्यक्तीला विधानसभेची उमेदवारी मिळावी ही आग्रही भूमिका समाजातील शिष्टमंडळाने पक्ष नेतृत्वाकडे केली आहे म्हणूनच माजलगाव मतदार संघातून मुस्लिम समाजापैकी शेख मंजूर यांनी समाजाच्या पाठिंब्यावर व नगराध्यक्ष पदाच्या कार्यकाळात केलेल्या विकास कामांवर पक्षाकडे आपल्या उमेदवारीची मागणी केली आहे. जिल्ह्यातील मुस्लिम समाजाच्या नजरा आता पक्षाच्या निर्णयाकडे लागलेल्या आहेत.

मुस्लिम समाजाला उमेदवारी वाटा द्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये मुस्लिम समाज बांधवांनी एकजुटीने भाजपाच्या विरोधामध्ये मतदान करून एक ऐतिहासिक निर्णय घेतलेला आहे परंतु होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये बीड जिल्ह्यात मुस्लिम समाजाला प्रतिनिधित्व देऊन न्याय द्यावा अन्यथा लोकसभेप्रमाणे या पक्षाला लोक मतदान करतीलच अशी परिस्थिती जिल्ह्यात नाही अशी चर्चा मुस्लिम समाज बांधवांमध्ये होताना दिसत आहे

# भगवान भक्तीगड, नारायणगडावर जाणाऱ्या 10 हजार भाविकांसाठी अल्पोपहाराची सोय

## डॉ.योगेश, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून नियोजन



बीड (प्रतिनिधी) दि.११ : पाटोदा तालुक्यातील सावरगाव घाट येथील भगवान भक्तीगड आणि शिरूर कासार तालुक्यातील नारायणगडावर आज (दि.१२) दसरा मेळाव्यानिमित्त जाणाऱ्या १० हजार भाविकांसाठी अल्पोपहाराची सोय केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, समर्थकांच्या पुढाकारातून हे नियोजन करण्यात आले. बीड शहरानजिक असलेल्या नवगण शिक्षण संस्था संचलित सैनिकी विद्यालयासमोरील मुख्य रोडलगत भाविकांसाठी स्टॉल उभारून आज दिवसभर अल्पोपहार, पाण्याची उत्तम सोय केली जाणार आहे. या मार्गावरून भगवान भक्तीगड, नारायणगडावर जाणाऱ्या भाविकांनी अल्पोपहाराचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ.योगेश, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केले आहे.

# माजलगाव मतदारसंघात यशवंतराव चव्हाण घरकुल योजनेत

## ४ हजार ६४३ लाभार्थ्यांना मंजुरी – आमदार प्रकाश सोळंके



माजलगाव, दि. १० (प्रतिनिधी) : माजलगाव विधानसभा मतदार संघात यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजनेत 4 हजार 643 लाभार्थ्यांना मंजुरी दिली असल्याची माहिती माजलगाव विधानसभेचे भाग्यविधाते आमदार प्रकाश सोळंके यांनी दिली आहे. आमदार प्रकाश सोळंके यांनी मतदारसंघ वासियांना ऐन सणासुदीच्या काळात मोठे गिफ्ट दिले आहे. माजलगाव विधानसभा मतदार यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजने अंतर्गत वैयक्तिक घरकुल योजने मध्ये हजारो लाभार्थ्यांनी राज्य शासनाकडे प्रस्ताव दाखल केले होते. प्रस्तावास मंजुरी मिळण्याबाबत सातत्याने मंत्री अतुल सावे यांच्याकडे आ. सोळंके यांनी केलेल्या सततच्या पाठपुराव्यामुळे माजलगाव मतदारसंघातील 4 हजार 643 लाभार्थ्यांच्या प्रस्तावास दि. 9 ऑक्टोबर 2024 रोजी राज्य शासनाने मंजुरी दिलेली आहे. याबद्दल इतर मागास बहुजन कल्याण विभागचे मंत्री ना. अतुल सावे यांचे आभार आ. प्रकाश सोळंके यांनी मानले. दरम्यान विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील गरजू नागरिकांना यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजनेतून स्वत:चे पक्के घर बांधण्यासाठी १ लाख वीस हजार रुपयांचा निधी दिला जातो. मतदार संघात मोठ्या प्रमाणावर घरकुल मंजूर झाले असल्याचेही आ.सोळंके यांनी सांगितले.

# नवी मुंबई विमानतळ धावपट्टीची चाचणी यशस्वी; सुखोईचे टेक ऑफ, यशस्वी लॅण्डींग महाराष्ट्राच्या प्रगतीची भरारी – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

उरण दि 11(विठ्ठल ममताबादे )नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीची आज यशस्वी चाचणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडली. वायुदलाचं C-295 या विमान धावपट्टीवर यशस्वीपणे उतरविण्यात आले. या विमानांना वॉटर कॅनानद्वारे अनोखी सलामी देण्यात आली. याबरोबरच लढाऊ सुखोई 30 (Sukhoi) विमानानेही यशस्वी टेक ऑफ केलं. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम आता जवळपास अंतिम टप्प्यात आहे. त्यासाठी विमानतळाच्या धावपट्टीची आज चाचणी करण्यात आली. या चाचणीनंतर सुखोई 30 या लढाऊ विमानानेही फ्लायपास केला. लँडींग करणाऱ्या सी 295 विमानाच्या वैमानिकाचा मुख्यमंत्री श्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री श्री फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी केंद्रिय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, सिडको महामंडळाचे अध्यक्ष संजय शिरसाट,खा. श्रीरंग बारणे,खा. सुनील तटकरे,खा. डॉ. श्रीकांत शिंदे, खा. नरेश म्हस्के, आ. गणेश नाईक,आ. प्रशांत ठाकूर, आ. महेश बालदी, अपर मुख्य सचिव गृह इकबाल चहल, सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, विजय सिंघल, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, विभागीय आयुक्त डॉ देशमुख, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. C295 विमान हे गांधीनगरहून तर सुखोई हे पुण्यातून आलं होते. यावेळी माध्यमाशी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आजचा दिवस इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल असे नमूद करून या यशस्वी चाचणीचे महत्त्व अधोरेखित केले. विमानतळाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे.विजयादशमीच्या एक दिवस आधी झालेल्या या कार्यक्रमामुळे सर्वसामान्य नागरिक आणि प्रवाशांसाठी मोठा आनंद आहे.

"मार्च 2025 मध्ये हे विमानतळ नियमित प्रवासी सेवेसाठी सुरू होईल. वेळेआधीच काम पूर्ण करण्याचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.तसेच सिडको ने केलेल्या उत्कृष्ट कामाबद्दल सर्व टीमचे अभिनंदन केले. हे विमानतळ सर्वसामान्यांसाठी मोठे आश्रयस्थान बनेल तसेच यामुळे महाराष्ट्राच्या प्रगतीला आणखी वेग येईल असेही मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले. या विमानतळामुळे हजारो रोजगाराच्या संधी निर्माण होतील, तसेच इथे आयटी पार्क आणि व्यावसायिक केंद्रे उभारली जातील असा विश्वास श्री शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

प्रवाशांसाठी फायदेशीर प्रकल्प - फडणवीस

नवी मुंबई विमानतळाच प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर या विमानतळावरुन दर वर्षी अंदाजे 9 कोटी प्रवासी प्रवास करतील असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे शिवडी न्हावाशेवा सी लिंक, मुंबई तसेच नवी मुंबई मेट्रो, दोन खाडी मार्गाने जोडला जात असून तो देशातील एक विशेष प्रकल्प ठरणार आहे.



# डॉ.योगेश क्षीरसागर यांच्याकडे बीड मतदारसंघाच्या विकासाचे व्हिजन

# बीड विधानसभा मतदारसंघात एका वर्षातच आणला २५ कोटींचा निधी



## बीड विधानसभा मतदारसंघात एका वर्षातच आणला २५ कोटींचा निधी



### आमदारांना जमले नाही ते योगेश क्षीरसागर यांनी करून दाखविले!

**बीडच्या स्थानिक आमदाराच्या आमदार फंडाइतका निधी डॉ.योगेशभैयांनी अवघ्या एका वर्षात खेचून आणला. यासोबतच मतदारसंघातील ४० स्मार्ट अंगणवाड्या, ग्रामीण रुग्णालय, पशुवैद्यकीय दवाखाना, सामाजिक सभागृह, सिमेंट रस्ते, नाली, बंधारा, दुरुस्तीची असंख्य सार्वजनिक कामे पूर्णत्वास गेली आहेत. त्यामुळे बीडच्या विकासाचे व्हिजन असलेला नेता म्हणून डॉ.योगेश क्षीरसागर यांची प्रतिमा तयार होत आहे.**

**बीड (प्रतिनिधी)**

दि.१० : बीड विधानसभा मतदारसंघासाठी मला निधी मिळत नाही म्हणून बीडच्या आमदारांचे सतत रडगाणे सुरू होते. परंतु त्यांना जे जमले नाही, ते राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी वर्षभरातच करून दाखविले. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर वर्षभरातच उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करून एका वर्षातच २५ कोटींहून अधिकचा निधी आणत बीड मतदारसंघाच्या विकासाचे व्हिजन असल्याचे दाखवून दिले आहे. थेट राज्य शासनाच्या विभागाकडून आणि जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून आतापर्यंत बीड विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागासाठी पहिल्या टप्प्यात ३ व दुसऱ्या टप्प्यात २ असा एकूण ५ कोटी रुपयांचा निधी मिळाला. शहरी भाग व प्रमुख गावांसाठी पहिल्या टप्प्यात ६ व दुसऱ्या टप्प्यात ७ असा १४ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला. तसेच, मतदारसंघातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रातील विकासासाठी शासनाने भरीव तरतूद केली. या योजनेतून पहिल्या टप्प्यात ३ व दुसऱ्या टप्प्यात ४ असा एकूण ७ कोटी रुपयांचा निधी मिळाला.



दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यापासून आजतागायत २५ कोटीहून अधिकचा निधी बीड विधानसभा मतदारसंघात आणला. त्यामुळे मतदारसंघातील विकासाची प्रक्रिया गतिमान झाली असून कोट्यवधींची विकासकामे प्रगतीपथावर आहेत. हे सर्व ना.अजितदादा पवार, ना.धनंजय मुंडे यांच्यामुळे शक्य झाले असल्याचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले.

## रतन टाटा: भारतीय उद्योगजगतातील द्रष्टा हरपला

मुंबई, १० ऑक्टोबर २०२४: भारतीय उद्योगजगताच्या आकाशातला तेजस्वी तारा रतन टाटा यांचे काल, ९ ऑक्टोबर २०२४ रोजी मुंबईत निधन झाले. वयाच्या ८६व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांचं निधन हे संपूर्ण देशासाठी एक मोठा धक्का आहे आणि त्यांच्या जाण्याने उद्योगविश्वात शोककळा पसरली आहे रतन टाटा हे नाव भारतीय उद्योगसृष्टीत आदराने आणि प्रेरणेने घेतले जाते. त्यांचा जन्म 28 डिसेंबर 1937 रोजी मुंबई येथे झाला. टाटा घराण्यात जन्मलेल्या रतन टाटांनी भारतीय उद्योगांना आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवून दिली. टाटा समूहाच्या अध्यक्षपदावर असताना त्यांनी विविध उद्योगांमध्ये नवनवीन दिशा दाखवली. रतन टाटांचे प्राथमिक शिक्षण मुंबईतील कॅथेड्रल आणि जॉन कॉनन स्कूलमध्ये झाले. त्यानंतर त्यांनी कॉर्नेल विद्यापीठातून आर्किटेक्चरमध्ये पदवी प्राप्त केली आणि हार्वर्ड बिझनेस स्कूलमधून मॅनेजमेंटची पदवी घेतली. शिक्षण पूर्ण केल्यानंतर ते टाटा समूहात रुजू झाले.त्यांच्या नेतृत्वात टाटा समूहाने जगभरातील मोठ्या कंपन्या खरेदी केल्या आणि 'टाटा नॅनो' सारख्या क्रांतिकारी उत्पादनांची निर्मिती केली. रतन टाटा हे फक्त उद्योगजगतातच नव्हे तर सामाजिक कार्यातही आघाडीवर आहेत. टाटा समूहाच्या फाउंडेशनमार्फत शिक्षण, आरोग्य, आणि ग्रामीण विकास या क्षेत्रांत त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. त्यांनी अनेक युवकांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती प्रदान केली आहे.


## श्री क्षेत्र नारायण गड येथे होणा-या भव्य दसरा मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, पांडुरंग बहिर

बीड प्रतिनिधी श्री क्षेत्र नारायण गड या ठिकाणी मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील व नारायणगडचे मठधिपती ह, भ, प, शिवाजी महाराज यांच्या उपस्थित, दिनांक 12 ,10.2024. वार शनिवारी दुपारी 12, वाजता होनार आहे, या यावेळी महाराष्ट्र राज्यातील खूप मोठ्या प्रमाणात समाज बांधव येणार आहे, या दसरा मेळाव्याला लाखोच्या संख्येने बांधवांनी समाज उपस्थित राहावे असे आव्हान मराठा सेवक पांडुरंग बहिर यांनी केले आहे,मॅडम व जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांच्या हस्ते आकर्षक"नवदुर्गा



सन्मानपत्र"भेटवस्तू व शिशु विहार विद्या प्रसारक मंडळाच्यावतीने आरोग्य विषयक पुस्तक प्रदान करुन यथोचित सत्कार करण्यात आला

## गांधी बाल मंदिर हायस्कूल मध्ये दसरा – शस्त्र पूजनाचा कार्यक्रम




गांधी बालमंदिर हायस्कूल कुर्ला मध्ये 3 महाराष्ट्र बटालियन आर्मी विंग एनसीसी च्या वतीने दसरा (विजयादशमी) निमित्त शस्त्र पूजनाचा कार्यक्रम आज संपन्न झाला. सदर कार्यक्रमाचे आयोजन एनसीसी कॅडेट व एनसीसी ऑफिसर श्री विश्वनाथ पांचाळ सर यांनी केले होते. विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीची , सण उत्सवाची ओळख व्हावी या दृष्टीने हा कार्यक्रम आयोजित केला होता. सदर कार्यक्रमांमध्ये शाळेतील सर्व सहकारी शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते.

## लाडकी बहीण योजनेसाठी पुन्हा एक संधी, आता या तारखेपर्यंत दिली मुदतवाढ,

महायुती सरकारची सर्वात महत्वकांक्षी योजना असलेल्या "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" योजनेला पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ आतापर्यंत ज्या महिलांना मिळाला नाही, त्यांच्यापर्यंत लाभ पोहचवण्यासाठी ही मुदतवाढ देणात आली आहे. आता महाराष्ट्रातील महिलांना मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजने अंतर्गत अर्ज करण्यासाठी 15 ऑक्टोबर 2024 ही नवीन मुदत दिली आहे.




यापूर्वी या योजनेत अर्ज करण्याची मुदत सप्टेंबर अखेरपर्यंत होती. आता 15 ऑक्टोबर 2024 रात्री बारा वाजेपर्यंत या योजनेत अर्ज करता येणार आहे. मात्र हे अर्ज फक्त अंगणवाडी सेविकामार्फतच भरावे लागणार आहे. महाराष्ट्र सरकारच्या लाडकी बहीण योजनेत ग्रामीण भागापासून शहरापर्यंत मोठा प्रतिसाद मिळाला होता. या योजनेसाठी अर्ज करण्यासाठी महिलांच्या लांबच लांब रांगा लागत होत्या. त्यामुळे सरकारने ॲप आणि ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्यास सुरुवात केली होती. परंतु आता जी मुदतवाढ दिली आहे. परंतु ऑनलाईन पद्धतीने किंवा ॲपने अर्ज करता येणार नाही. आता फक्त अंगणवाडी सेविकामार्फतच अर्ज करावा लागणार आहे.

## 'मी भाजपमध्ये सर्वात सिनियर', गिरीश महाजन यांचं मोठं वक्तव्य

मंत्री गिरीश महाजन यांच्या जामनेर मतदारसंघात आज महायुतीचा कार्यक्रम पार पडला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य पुतळ्याचं अनावर झालं. या कार्यक्रमात गिरीश महाजन यांनी भाषण करताना आपण भाजपमध्ये सर्वात सिनियर अल्याचं वक्तव्यत केलं. "माझ्या मनामध्ये शब्द होता. कार्यकर्त्यांच्या मनात स्वप्न होतं की, जामनेर शहरामध्ये आमचा जाणता राजा, रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराज यांचं स्मारक व्हावं. त्यांचा



भव्यदिव्य पुतळा असावा आणि आज प्रत्यक्षात आपण बघतोय. राज्यात कुठे नसेल असा राजांचा दरबार याठिकाणी असेल. सावित्रीबाई फुले, महात्मा फुले, महाराणा प्रताप, अहिल्यादेवी होळकर, अण्णा भाऊ साठे असे सर्व पुतळे आपण भविष्यात उभारणार आहोत. जामनेर शहर आणि तालुका कसा झाला हे बघण्यासाठी राज्यभरातील देशभरातील लोक या ठिकाणी येतील आणि आले पाहिजे", असं गिरीश महाजन म्हणाले.



आज माजलगाव मतदार संघाचे नेते.माधव.तात्या.निर्मळ.मोरफळी ता. धारूर येथे अखंड हरिनाम सप्ताह निमित काल्याचे किर्तनात उपस्थिती लावली. या वेळी काल्याचे सुश्राव्य किर्तन ह.भ.प.भगवान महाराज गडदे यांचे पार पडले. यावेळी उपस्थित सरपंच महादेव गडदे, सरपंच शिवाजीराव काळे उपसरपंच , अशोकराव जाधव, माजी सरपंच वैजनाथ गडदे, माजी सरपंच शेषेराव गडदे, चैरमन दामू अण्णा वलेकर , वसंतराव जाधव, नवनाथ गडदे, महेश कोळेकर , केशव गडदे, बिभीषण गडदे, परमेश्वर गडदे, , दत्तात्रय गोंदने आणी ईतर.

## मा.मनोज जरांगे पाटील यांच्या मुळ गावी मातोरी येथील झालेल्या दंगलीतील आरोपी अशोक जरांगे यांचा अटकपुर्व जामीन मंजूर......

माजलगाव ..बीड जिल्ह्यातील मातोरी गावामध्ये संध्याकाळी 8 वाजताच्या सुमारास दोन गटांमध्ये तुफान दगडफेक करत गाड्यांची तोडफोड करण्यात आली होती त्यावरून दि.28/06/2024 रोजी चकलांबा पोलिस स्टेशन येथे फिर्यादी स्वतः पोलिसांकडून 17 आरोपींविरुद्ध भा.द.वी चे कलम 308,341,427,160,143,147,148,149, अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला या मध्ये फिर्यादी ने सांगितले आहे की, दि. 27/06/2024 संध्याकाळी 8 वाजता काही लोक रस्त्याच्या कडेला जमले आहेत व ते येणा-या जाणा-या लोकांवर व गाड्यांवर दगड मारत आहेत अशी बातमी स.पोनि.एकशिंगे साहेब यांनी बोलवून कळवले असता फिर्यादी व इतर पोलिस अधिकारी तिथे सरकारी वाहनाने गेले असता आम्हाला आरोपी मारामारी



करताना व गाड्या फोडताने दिसुन आले वाहनामध्ये लोक असुन सुध्दा त्या लोकांना जखमी करुन गाड्यांची तोडफोड करत होते नंतर पोलिस सायरन वाजल्या नंतर आरोपी तिथून पळुन गेले नंतर आरोपी विरोधात वरील कलमाअतर्गंत गुन्हा नोंद करण्यात आला त्यानंतर आरोपी अशोक श्रीधर जरांगे यांनी मा.जिल्हा व सत्र न्यायालय, बीड येथे ॲड वैभव सोळंके यांच्या मार्फत अटक पुर्व जामीन अर्ज दाखल होता त्यानंतर ॲड वैभव सोळंके यांनी प्रभावी युक्तीवाद केला असता मा.जिल्हा व सत्र न्यायालय, बीड यांनी ॲड वैभव सोळंके यांचा युक्तीवाद ग्राह्य धरुन आरोपी अशोक जरांगे यांचा जामीन मंजूर केला याकामी ॲड वैभव सोळंके साहेब यांना ॲड लखन सोळंके, ॲड प्रकाश गायकवाड, व सिद्धांत खोपे यांनी सहकार्य केले.

## नारायण गड दसरा मेळावा; आम्ही आपली वाट पाहतोय

### विश्वस्त बळीराम गवते यांचे अवाहन

बीड: धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नारायण गड येथील पारंपारिक दसरा मेळावा महंत शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत होत असून या मेळाव्यास, नारायण गडाच्या भाविक-भक्तांनी उपस्थित रहावे, आम्ही आपली वाट पाहत आहोत, असे अवाहन गडाचे विश्वस्त बळीराम गवते यांनी केले आहे. प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे, धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नगद नारायण गड (ता. शिरूर) येथे पांरपारिक दसरा मेळाव्याची तयारी अंतिम टप्प्यात आलेली आहे. मागील आठ दिवसांपासून याठिकाणी गडाचे भाविक भक्त श्रमदान करत होते. मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत आणि गडाचे महंत शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या या दसरा मेळाव्याला राज्यातून भाविक भक्त येणार आहेत. गडावर येणाऱ्या भाविकांच्या गाड्यांसाठी चार ठिकाणी पार्कींग व्यवस्था करण्यात आलेली आहे. बेलूरा मार्गे येणाऱ्या वाहनांसाठी गडाच्या पायथ्याशी आणि गडावरही २०० एकरात पार्कींग व्यवस्था केलेली आहे. शिवाय दुचाकीसाठी स्वंतत्र पार्कींग देण्यात येणार आहे. केतूरा, साक्षाळपिंप्री आणि पौडूंळ या तीन मार्गात गडाच्या पायथ्याशी पार्कींग व्यवस्था असणार आहे. तर परजिल्ह्यातून येणाऱ्या भाविकांसाठी मुक्कामाची मोफत सोय करण्यासाठी बीड येथे दहा मंगल कार्यालय सुरू ठेवण्यात येत आहेत. मागील पाच दिवसांपासून याठिकाणी महाप्रसादाची तयारी सुरू आहे. तर पाण्यासाठी १० लाख पाणी बॉटलचे नियोजन करण्यात आले आहे. उन्हाळ्याचे दिवस असल्याने पाणी अधिक लागेल म्हणून ५० टँकर गडाच्या



रिंगरोडला उभा केली जाणार आहेत. उन असल्याने आणि गर्दी असल्याने आरोग्याचे काही प्रश्न उद्भवल्यास याठिकाणी वेळेत उपचार मिळावेत, यासाठीदहा खाटांचे आयसीयू बेड तयार करण्यात आले आहे. याच बरोबर चौदा ठिकाणी वैद्यकिय स्टॉल लावलेआहेत. दहा स्टॉल रिंग रोडला तर चार गडाच्या पायथ्याशी असलेल्या पार्कींग जवळ असतील. ५१ रुग्णवाहिका, ४५० डॉक्टर असतील. गडावर पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणात दसरा मेळावा मोठा होत असल्याने गडाची सजावट ११ टन फुलांनी करण्यात येत आहे.याठिकाणी मराठमोळे ढोल पथक, लेझीम पथक, हलगी पथक, भारूर, शाहिर येणार आहेत. पारंपारिक वाद्यांचा आवाजात महंत शिवाजी महाराज आणि मनोज जरांगे पाटील यांची मिरवणूक निघेल.२०० एकरमध्ये मनोज जरांगे पाटील यांची सभा होत आहे. याठिकाणी ७५०० भगवे झेंडे लावून हा परिसर भगवामय करून टाकला आहे. शिवाय गर्दीत गोंधळ उडणार नाही, यासाठी ११ हजार स्वंयसेवक गडाच्या वतीने नेमण्यात आले आहेत. आता तयारी पुर्ण झाली असून आपण सर्वांनी उपस्थित रहावे, असे अवाहन विश्वस्त बळीराम गवते यांनी केले आहे.

## दसरा मेळाला नारायणगडावर एकत्र येऊन मनोज जरांगे पाटील यांचे हात बळकट करावे - गोकुळ इंगोले




बीड प्रतिनिधी:- शेतकऱ्याच्या दीनदुबळ्या व कष्टकरी गोरगरीब जनतेच्या न्याय हक्कासाठी मराठा समाजाचा व अठरापगड सर्व जाती धर्मासाठी नारायणगड येथे भव्य दिव्य असे दसरा मेळाव्याचे आयोजन सुरु आहे या अनुषंगाने नारायण गड परिसरात सर्व येणाऱ्या लोकांचे गैरसोय होऊ नये यामुळे मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आदेशावरून सर्व गोष्टीची बारकाईने लक्ष देऊन तयारी चालू आहे जेणेकरून येणाऱ्या बांधवांची पार्किंगची व्यवस्था किंवा राहण्यापासून ते जेवण्यापासून सर्व गोष्टीची व्यवस्था मोठ्या प्रमाणात होत आहे दसरा मेळाव्याच्या तयारीसाठी असे हजारो हात राबत आहेत बाहेरुन येणाऱ्या भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही त्यांच्या पायात काटा देखील टोचणार नाही याची पुरेपूर काळजी घेतली जात आहे. लाखो भाविक व मराठा बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहील त्यामुळे येणाऱ्या 12 तारखेला नारायणगड येथे आपण सर्वांनी आपल्या कुटुंबाबरोबर व आपल्या मित्रपरिवार बरोबर मोठ्या संख्येने उपस्थित राहून या होऊ घातलेल्या दसऱ्या मेळाव्याची शोभा वाढवावी व संघर्ष युद्ध मनोज दादा तरंगे पाटील यांचे हात बळकट करावे असे मराठा बांधव सामाजिक गोकुळ इंगोलेयांनी सर्व बांधवांना आवाहन केलं आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

शनिवार १२ ऑक्टोबर २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4




# माझ्या अंगाला काही भोकं पडत नाहीत : अजित पवार कुणावर संतापले?

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक अद्याप जाहीर झालेली नाही. पण तरीही सर्वच पक्षांकडून जोरदार तयारी सुरु आहे. त्यातच आता विधानसभा निवडणुकांपूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार हे ॲक्शन मोडवर आले आहेत. गेल्या काही दिवसांपासून अजित पवार हे बारामतीतून निवडणूक लढणार नाही, अशी चर्चा रंगली आहे. पण आता त्यांनी पुन्हा एकदा बारामतीतून निवडणूक लढवण्याचे संकेत दिले आहेत. “जसे कोकाटे यांचे सिन्नर तालुका हे कुटुंब आहे, तसं माझं देखील बारामती हे कुटुंब आहे”, असे वक्तव्य अजित पवार यांनी केले. त्यांच्या वक्तव्यानंतर अजित पवारांनी बारामतीमधूनच निवडणूक लढण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. “विरोधक मला बदनाम करण्याचा प्रयत्न करतात”



“लाडकी बहीण योजना बंद पाडण्यासाठी विरोधक कोर्टात गेले. पण बटण कुठल दाबायचं यावर तुमची योजना सुरू राहणार की बंद होणार हे ठरणार आहे. विरोधक मला बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहेत. पण विरोधकांना हात जोडून विनंती आहे, मला जी शिवीगाळ करायची ती करा, माझ्या अंगाला भोक पडत नाही. या योजनेबद्दल खोट सांगून महिलांच्या स्वप्नांची राख रांगोळी करू नका”, असे अजित पवार म्हणाले.

“आम्ही कामाची माणसे, बिनकामाचे नाही. नाशिकने मला कायमच चांगले आमदार दिले आहेत. आपपासातील वाद इथे अणू नका. ही आपल्यासाठी महत्वाची निवडणूक असणार आहे. आता कुठे सुरुवात झाली आहे? 5 वर्षात जेवढे आमदार निवडून गेले, त्यांच्यापेक्षा राष्ट्रवादीची कारकीर्द सगळ्यात चांगली असेल”, असे अजित पवारांनी म्हटले.

## “बहिणींना दिलेली ओवाळणी कोणी काढून घेतो का रे?”

अजित पवार यांची जनसन्मान यात्रा ही सिन्नर तालुक्यात होती. यावेळी त्यांनी जोरदार भाषण केले. यावेळी बोलताना अजित पवारांनी विरोधकांवर जबरदस्त टीका केली. “रक्षाबंधनाला ओवाळणी दिली तर विरोधक म्हणतं होते की लवकर पैसे काढून घ्या. पण बहिणींना दिलेली ओवाळणी कोणी काढून घेतो का रे? यासाठी धमक असावी लागते. हे काम येड्या गबळाचे नाही”, असे अजित पवार म्हणाले.

### “येड्या गबळाचे काम नाही”

“लाडकी बहिण योजनेला विरोधक म्हणाले की हा चुनावी जुमला आहे. पण मी तुम्हाला विचारतो, माय माऊली दिले की नाही? सगळे सोंग करता येते, पैशाचे करता येत नाही. रक्षाबंधनाला ओवाळणी दिली तर म्हणे घ्या काढून लवकर. बहिणींना दिलेली ओवाळणी कोणी काढून घेतो का रे? यासाठी धमक असावी लागते, येड्या गबळाचे काम नाही. ती तिला पाहिजेल ते खर्च करेल”, असेही अजित पवारांनी म्हटले.

**विधानसभा निवडणुकांपूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार हे ॲक्शन मोडवर आले आहेत. गेल्या काही दिवसांपासून अजित पवार हे बारामतीतून निवडणूक लढणार नाही, अशी चर्चा रंगली आहे.**

# राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचे नांदेड विमानतळावर आगमन

नांदेड दि. 11 ऑक्टोंबर राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचे नांदेडच्या गुरुगोविंद सिंघजी विमानतळावर सायंकाळी पाच वाजता आगमन झाले. प्रशासनाच्यावतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी विमानतळावर माजी मुख्यमंत्री तथा खासदार



अशोक चव्हाण, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.मनोहर चासकर, नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, नांदेड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगांवकर आदींची उपस्थिती होती. यावेळी पोलीस दलातर्फे त्यांना मानवंदना देण्यात आली.

# स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीचे दर्शन घेऊन प्रा.ईश्वर मुंडे यांनी दिली पक्षाकडे मुलाखत

किल्ले धारूर (प्रतिनिधी) सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात खा.शरदचंद्र पवार हे बीग बॉस च्या भूमिकेत दिसत आहेत. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पक्षात अनेकांचे इन कमिंग होत आहेत कांही जन रांगेत उभे आहेत.

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडे ज्या ईच्छूक उमेदवारांनी अधिकृत पक्षाचे सदस्यत्व फीस व नाममात्र पक्ष निधी जमा केलेला आहे अशा इच्छूक उमेदवीरांच्या



मुलाखती मार्केट यार्ड पुणे येथील निसर्ग कार्यालयात दि.५ ऑक्टोबर २०२४ शनिवारी घेण्यात आल्या.

या मुलाखतीसाठी दस्तूर खुद खा.शरदचंद्र पवार,खा. फौजिया खान,खा.वंदना चव्हाण,आ.राजेश टोपे,खा. बजरंग बप्पा सोनवणे,आ. रोहीत पवार,महेबुब शेख,राज राजापूरकर,हिरालाल राठोड,डॉ.नरेंद्र काळे यांचे सह पार्लमेंट्री बोर्ड चे सदस्य उपस्थीत होते.

सर्वच इच्छूक उमेदवार पक्षाकडे मुलाखती देत आसतात परंतू प्रा. ईश्वर मुंडे यांची मुलाखत ही वैशिष्टय पूर्ण झाली. याचे कारण म्हणजे हिमालयाच्या मदतीला धावलेले सह्याद्री,पुरोगामी विचारांचा वसा व वारसा चालवणारे,खा.शरदचंद्र पवार यांचे श्रध्दास्थान,महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या प्रिती संगम (कृष्णा - कोयना) कराड जि. सातारा येथील समाधीचे दर्शन घेऊन,आशिर्वाद घेऊन मुलाखत दिली.

आपली पक्ष निष्ठा व खा.शरदचंद्र पवार यांच्या सोशल इंजिनिअरींच्या राजकीय खेळीमुळे आपल्यालाच उमेदवारी मिळेल या आत्मविश्वासाने प्रा. ईश्वर मुंडे यांनी मतदार संघात जन संपर्क वाढवला आहे.

उच्च शिक्षीत,स्वच्छ प्रतिमा व सर्व समावेशक चेहरा या मुळे प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांना माजलगाव मतदार संघातील मतदारांकडून पसंती मिळत आहे.

# अविष्कार बीड अंतरजिल्हा स्पर्धेत श्री सिद्धेश्वर महाविद्यालयला प्रथम क्रमांक



माजलगाव प्रतिनिधी दिनांक ११/१०/२०२४ श्री सिद्धेश्वर महाविद्यालयातील आविष्कार विभागाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर आयोजित अविष्कार 2024 या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना संशोधन वृत्ती निर्माण व्हावी यासाठी जिल्हा निहाय अविष्कार कार्यक्रमांचे नियोजन विद्यापीठाच्या पातळीवर करण्यात आले. बीड जिल्हा अविष्कार 2024 कार्यक्रम विद्यार्थ्यांचे व प्राध्यापकांचे सादरीकरण दिनांक 10 ऑक्टोबर 2024 मध्ये विद्यापीठाने के. एस. के. महाविद्यालय बीड या ठिकाणी आयोजित केले होते. या संशोधन पर आविष्कार कार्यक्रमासाठी महाविद्यालयातून पाच विभागाने आपले संघ पाठवले होते. त्यामध्ये भाषा शास्त्र विभागातून हिंदी विभाग, सामाजिक शास्त्रीय विभागातून इतिहास विभाग आणि अर्थशास्त्र विभाग, विज्ञान शाखेतून रसायनशास्त्र आणि प्राणीशास्त्र या विभागातून एकूण सहा विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये चार विद्यार्थिनी आणि दोन विद्यार्थी सहभागी झाले होते. भाषा विद्या शाखा विभागातून हिंदी विभाग मधून डॉ. युवराज मुळये ,डॉ. गंगाधर उषमवार यांच्या मार्गदर्शनाखाली कु. सानिया शफिक शेख बी.ए. तृतीय वर्ष या विद्यार्थिनीने सहभाग नोंदवला होता. तिने पोस्टरच्या माध्यमातून आपले सादरीकरण केले. विषय होता ‘संत कबीर की प्रासंगिकता’, सामाजिक शास्त्र विभागातून इतिहास विभागाच्या माध्यमातून अशोक लक्ष्मण शिंगारे बी.ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्याने विभाग प्रमुख डॉ.गोरखनाथ फसले व डॉ. के. के. मालू यांच्या मार्गदर्शनातून ‘एक्सप्लोरिंग बीड डिस्ट्रिक्ट हिडन गेम इन महाराष्ट्र’ या विषयावर आपले पोस्टरचे सादरीकरण केले. अर्थशास्त्र विभागाच्या माध्यमातून अजीम रहीम शेख बी.ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्याने विभाग प्रमुख डॉ. महेश देशमुख आणि प्राध्यापिका मंदा मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या पोस्टरचे ‘रिझर्व बँकेचे चलनविषयक धोरण’ या विषयावर सादरीकरण केले. विज्ञान विभागातून रसायनशास्त्र भागातून च्या माध्यमातून या विषयावर कु. मोहिनी चंद्रशेखर पायघन बी.एस्सी. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनीने विभाग प्रमुख प्रा.डॉ. विकास बोरगावकर प्रा. अक्षय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली ‘वायरलेस चार्जिंग रोड फॉर इलेक्ट्रिक व्हेईकल’ या विषयावर आपल्या पोस्टरचे व मॉडेलचे सादरीकरण केले. प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने कु. रेणुका नागेश जोशी बी.एस्सी तृतीय वर्ष, व कु. ऋतुजा एकनाथ रांजण बी.एस्सी प्रथम वर्ष या विद्यार्थिनींनी ‘फिश डायव्हर्सिटी अँड शो इकॉनोमिक कंडिशन ऑफ फ्रेश वॉटर रिझर्व वायर माजलगाव डॅम इन महाराष्ट्र स्टेट’ या विषयाच्या अंतर्गत आपल्या पोस्टरचे सादरीकरण केले. वरील पाच विभागाने आपल्या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून विद्यापीठ आयोजित बीड जिल्हा अंतर्गत अविष्कार 2024 साठी सादरीकरण केले. त्यामधून रसायनशास्त्र विभागातून कु. मोहिनी चंद्रशेखर पायघन द्वितीय वर्ष या विद्यार्थिनीचा अविष्कार जिल्हास्तरीय स्पर्धेत प्युअर सायन्स मॉडेल या कॅटेगिरी मध्ये तिच्या मॉडेल सादरीकरणाला प्रथम क्रमांक मिळाला. अविष्कार 2024 कार्यक्रमासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर यांनी आयोजित केलेल्या जिल्हा निहाय सादरीकरण साठी बीड जिल्ह्यातील के.एस.के. महाविद्यालयासाठी महाविद्यालयातून पाच विभागाचे पाच संघ आविष्कार विभाग सिद्धेश्वर महाविद्यालय यांच्या माध्यमातून पाठविण्यात आले. अविष्कार विभागाचे समन्वयक डॉ. सीताराम इंगोले, सहाय्यक प्रा. डॉ .गोरक्षनाथ फसले यांनी काम पाहिले. या संपूर्ण टीमला आणि अविष्कार विभागाला मार्गदर्शन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. सुहास मोराळे सर यांनी केले. या संपूर्ण अविष्कार 2024 या कार्यक्रमासाठी सहकार्य डॉ. महेश देशमुख, डॉ, युवराज मुळये, डॉ. गजानन होंन्ना यांनी केले.

# विधानसभा निवडणुकीआधी ४ मेळावे आणि शक्तिप्रदर्शन, मैदान कोण मारणार?

आज 4 मोठे मेळावे पार पडणार आहेत. दुपारी पंकजा मुंडे आणि जरांगे पाटील यांचा मेळावा आहे. तर संध्याकाळी उद्धव ठाकरे आणि मुख्यमंत्री शिंदे यांची तोफ धडाडणार आहे. दसऱ्याला एकाच दिवशी 4 मेळावे आहेत. सावरगावात पंकजा मुंडेंचा मेळावा, रायगडावर मनोज जरांगे पाटलांचा मेळावा, मराठवाड्यात पंकजा मुंडे ओबीसींवरुन तर जरांगे मराठा आरक्षणावरुन पुढची भूमिका स्पष्ट करतील. इकडे मुंबईत 2 शिवसेनेत टक्कर पाहायला मिळेल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचा मेळावा आझाद मैदानात आहे.मराठा आरक्षणाचा मुद्दा हाती




घेतल्यानंतर मनोज जरांगे पाटील हे पहिल्यांदाच दसरा मेळावा घेत आहेत. नारायगडावर तयारीही जोरदार झाली आहे. पंकजा मुंडे आणि जरांगेंच्या 2 दसरा मेळाव्यांनी मराठवाड्याची दिशाच ठरणार आहे. लोकसभा निवडणुकीत विशेषत: मराठवाड्यात जरांगे फॅक्टरचा परिणाम दिसला आणि बीड लोकसभेत पंकजा मुंडे पराभूत झाल्या. त्यामुळं त्या पराभवावर पंकजा काय बोलतात, हेही कळेल. जरांगेंनी तर आधीच भाषणाचा अजेंडा मराठा आरक्षणच असेल हे दाखवून दिलं आहे. बीडमधील सर्व ओबीसी बांधवांनी मेळाव्याला वाजत गाजत येण्याचे लक्ष्मण हाके यांनी आवाहन केले आहे. लक्ष्मण हाके देखील या मेळाव्याला उपस्थित राहणार आहेत. पंकजांच्या सावरगावातल्या मेळाव्याचं वैशिष्ट्य म्हणजे 10 वर्षात पहिल्यांदाच धनंजय मुंडे या मेळाव्याला हजर राहणार आहेत. माझ्या भावना अभूतपूर्व असल्याचं धनंजय मुंडे म्हणाले आहेत. दुपारी पंकजा मुंडे आणि जरांगेंचा मेळावा होईल. तर संध्याकाळी उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदेंचा मुंबईत मेळावा आहे. पुढच्या 2-3 दिवसांतच निवडणुकीची घोषणा होणार आहे. त्यामुळं उद्धव ठाकरे महाविकास आघाडीचं जागा वाटप, मुख्यमंत्रिपदाचा चेहरा ते सत्तासंघर्षाचा न लागलेला निकाल आणि मुख्यमंत्री शिंदेंवर तुटून पडतील. गेल्या दसरा मेळाव्यातही उद्धव ठाकरेंनी सरकार आल्यावर उलटं टांगण्याची टीका केली होती. अडीच वर्षांआधी शिवसेनेत फूट पडल्यानंतर आता विधानसभा निवडणुकीत जनता फैसला करणार आहे. त्याआधी दसरा मेळाव्याच्या निमित्तानं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे दोघांचंही शक्तिप्रदर्शन दिसेल.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com